# मू.जे.(स्वायत्त) महाविद्यालयात 17-18 जानेवारीला रंगणार चैतन्य- 2025 वार्षिक स्नेहसंमेलन

मूळजी जेठा (स्वायत्त) महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांच्या उत्कट सादरीकरणाचा उत्सव असलेले चैतन्य -2025 वार्षिक स्नेहसंमेलन दि.17 आणि 18 जानेवारी 2025 ला आयोजित करण्यात आले आहे. या मध्ये सुरुवातीला विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी घेतल्या जाणाऱ्या क्रिकेट स्पर्धा, बॅटमिंटन स्पर्धा, बुद्धिबळ स्पर्धा ह्या एकलव्य क्रीडा संकुलाच्या वतीने आजपासून सुरु करण्यात आल्या. या क्रीड़ा स्पर्धांचे उद्घाटन या स्नेहसंमेलनाचे चेअरमन डॉ.भूपेंद्र केसूर यांच्या हस्ते करण्यात आले.

मू.जे.महाविद्यालयाच्या चैतन्य -2025 मध्ये दि. 16 जानेवारी रोजी विद्यार्थी विविध प्रकारच्या थीमवर आधारित वेशभूषा करणार आहेत. त्याचप्रमाणे या स्नेहसंमेलनामध्ये दि.17 आणि 18 जानेवारी या दोन दिवसात मूल्जीयंस गायक, ऑर्केस्ट्रा, एकल आणि समूह नृत्य, एकांकिका, हास्यप्रधान खेळ, अंताक्षरी, प्रश्नमंजुषा, विविध छंद आणि ललित कला, काव्य वाचन, कथाकथन, वक्तृत्व आणि गंमत-जम्मत कवितेतून, फूड फेस्टिवल अशा अनेक प्रकारच्या स्पर्धांमध्ये महाविद्यालयाचे आपल्या अंगभूत कला-गुणांचे सादरीकरण करणार आहेत. त्याच प्रमाणे मागील वर्षी विविध विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह गौरव करण्यात येणार आहे. सोबतच शैक्षणिक वर्ष 2024-2025 मधील महाविद्यालयाचा बेस्ट स्टुडंट आणि विद्या शाखानिहाय 3 प्रिन्सिपल रोल ऑफ ऑनर्स विद्यार्थ्यांचा ही मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. या स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजन-नियोजनासाठी एकूण 21 समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सं.ना.भारंबे आणि वार्षिक स्नेहसंमेलन प्रमुख डॉ.भूपेंद्र केसूर यांनी दिली आहे.